रयत शिक्षण संस्थेचे

# डी. पी. भोसले कॉलेज, कोरेगाव

## पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग

२०२३-२४

## युवास्पंदन – भित्तिपत्रक

## प्रजासत्ताक दिन

**२६ जानेवारी २०२४**

### संपादक मंडळ

**अध्यक्ष** : प्र. प्राचार्य, डॉ. बाळासाहेब चव्हाण

**चेअरमन** : डॉ. देवानंद सोनटक्के

**सदस्य** : प्रा. मयुरी जाधव
: प्रा. अश्विनी मांढरे

**विद्यार्थी**

१. आरती राठोड, बी. ए. २
२. श्रेया भोसले, बी. ए. २
३. प्राजक्ता गुरव बी. ए. २
४. नंदिनी राऊत, बी. ए. २
५. प्रियांका कांबळे , बी. ए. १
६. सुजाता राठोड, बी. ए. १




**प्रजासत्ताक दिवस** : हा दिवस प्रत्येक भारतीयांसाठी फार महत्वाचा आहे. त्यापैकी एक म्हणजे ‘प्रजासत्ताक दिन’ हा होय. दर वर्षी जानेवारी महिन्याच्या २६ तारखेला भारताचा ‘प्रजासत्ताक दिन’ साजरा केला जतो. आपला भारत १५ ऑगष्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला. पण त्याची लोकशाही राज्य घटना २६ जानेवारी १९५० रोजी अमलात आली. म्हणून हा ‘प्रजासत्ताक दिन म्हणून मानला जातो. आमचा भारत हे एक मोठे लोकशाही राज्य आहे म्हणजे हे लोकांचे , लोकांनी,लोकांसाठी चालविलेले राज्य आहे. हा अधिकार भारताच्या घटनेनुसार २६ जानेवारी १९५० साली मिळाला. त्यादिवसापासून प्रजेची सत्ता सुरु झाली.

आरती राठोड ( बी.ए.भाग २)




## प्रजासत्ताक दिन का साजरा करावा?


प्रजासत्ताक दिन साजरा करण्याचे मुख्य कारण म्हणजे या दिवशी भारतात प्रजासत्ताक आणि राज्यघटना अंमलात आली. याशिवाय या दिवसाचा आणखी एक इतिहास आहे, जो खूपच मनोरंजक आहे. डिसेंबर 1929 मध्ये लाहोरमध्ये पंडित नेहरूंच्या अध्यक्षतेखाली झालेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनापासून त्याची सुरुवात झाली. ज्यामध्ये काँग्रेसने जाहीर केले होते की जर भारताला 26 जानेवारी 1930 पर्यंत स्वायत्त सरकार (डोमिनियन स्टेटस) दिले नाही, तर त्यानंतर भारत स्वतःला पूर्णपणे स्वतंत्र घोषित करेल, परंतु जेव्हा हा दिवस आला आणि ब्रिटिश सरकारकडून या प्रश्नावर कोणतेही उत्तर दिले गेले नाही, तेव्हा त्या दिवसापासून संपूर्ण स्वातंत्र्य मिळविण्याच्या ध्येयाने काँग्रेसने सक्रिय चळवळ सुरू केली. यामुळेच आपला भारत देश स्वतंत्र झाला तेव्हा 26 जानेवारी या दिवशी संविधान स्थापनेसाठी निवडण्यात आली.

श्रेया भोसले (बी.ए.भाग २)




**भारतीय प्रजासत्ताक दिवस** हा भारताच्या प्रजासत्ताकात दरवर्षी २६ जानेवारी रोजी पाळला जाणारा *राष्ट्रीय दिन* आहे. याला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताचे संविधान संविधान समितीने २६ नोव्हेंबर , इ.स. १९४९ रोजी स्वीकारले व २६ जानेवारी इ.स. १९५० रोजी पासून भारतीय संविधान अंमलात आले. जवाहरलाल नेहरू यांनी ३१ डिसेंबर, इ.स. १९२९ रोजी लाहोरजवळ रावी नदीच्या काठी अशोक चक्रांकित तिरंगा ध्वज फडकावून पूर्ण प्रजासत्ताकाची (स्वातंत्र्याची) घोषणा केली होती. त्याची आठवण म्हणून २६ जानेवारी हा दिवस राज्यघटना अंमलात आणण्यासाठी निवडण्यात आला. या दिवशी देशभरात भारताच्या राष्ट्रध्वजाचे आरोहण होऊन त्याला वंदना दिली जाते. भारताचे राष्ट्रगीत म्हटले जाते आणि आदर व्यक्त केला जातो. हा दिवस आपल्या देशातील सुवर्ण दिन आहे. या दिवसाची प्राप्ती हजारो देशभक्तांच्या बलिदानातून झाली होती. या दिवशी शाळा महाविद्यालयांमध्ये भाषणाचे कार्यक्रम आयोजित केले जाते.

**नंदिनी राऊत( बी. ए भाग २ )**


जयहिंद
तनी-मनी बहरुदे नव-जोम,
होऊदे पुलकित रोम-रोम...
घे तिरंगा हाती,
नभी लहरु दे उंच उंच...
जयघोष मुखी,
जय भारत - जय हिंद,
गर्जुदे आसमंत...
© www.chitrakavita.com

# भारतीय संविधानाची निर्मिती



भारतात अनेक जाती आणि धर्मांचे, वेगवेगळ्या संस्कृतीचे, वर्गांचे लोक एकत्र राहतात. भारतीय लोकशाहीमुळेच वेगवेगळ्या गटांना संसदेत प्रतिनिधित्व मिळालं आहे. भारतीय लोकशाही बळकट करण्याचं श्रेय हे भारतीय स्वातंत्र्यानंतर राज्यघटनेची निर्मितीच्या प्रक्रियेलाच द्यावं लागेल. भारतीय संविधान हे अनेक लोकांच्या परिश्रमातून , अभ्यासातून, आणि संशोधनातून निर्माण झालं आहे. बाबासाहेब आंबेडकर हे ड्राफ्टिंग कमिटीचे म्हणजेच घटनेच्या मसुदा समितीचे प्रमुख होते. भारतीय संविधानाचं स्वरूप कसं असावं , त्याची चौकट त्यांनी आखली , विविध विषयांवरील तज्ज्ञांकडून मिळणारी माहिती , त्यांच्या सूचना ध्यानात घेऊन त्या राज्यघटनेत कशा येतील याचा विचार बाबासाहेबांनी केला. राज्यघटनेच्या

निर्मितीत त्यांनी जो मोठा वाटा उचलला आहे त्यामुळे त्यांना राज्यघटनेचा शिल्पकार म्हटलं जातं.

राज्यघटना तयार करण्याची प्रक्रिया ही प्रदीर्घ होती. 9 डिसेंबर 1946 रोजी भारताची घटना समिती पहिल्यांदा एकत्र आली आणि त्यांनी भविष्यातल्या भारताची दिशा ठरवली.डॉ. आंबेडकरांची घटनेच्या मसुदा समितीवर नियुक्ती 28 ऑगस्ट 1947 रोजी झाली. 141 दिवसांच्या परिश्रमानंतर घटना समितीने पहिला मसुदा तयार केला. तो दिवस होता 3 नोव्हेंबर 1947.भारताच्या स्वातंत्र्यानंतर पुढील अडीच वर्षांत संसदेत घटना समितीची एकूण 12 सत्रं पार पडली. घटनेतील प्रत्येक शब्द तोलून मापून आणि पूर्ण विचारांती लिहिण्यात आला. 9 डिसेंबर 1946 रोजी घटना समितीच्या सदस्यांची पहिली बैठक झाली होती. त्यानंतर 2 वर्षं, 11 महिने आणि 18 दिवसांच्या परिश्रमानंतर 26 नोव्हेंबर रोजी राज्य घटनेचा मसुदा तयार झाला. 26 नोव्हेंबर 1949 रोजी भारतीय राज्यघटना स्वीकारण्यात आली आणि 26 जानेवारी 1950 ला ती अंमलात आणली गेली. तेव्हापासून आजपर्यंत आपण एक प्रजासत्ताक, सार्वभौम राष्ट्र म्हणून ओळखले जातो.

**प्राजक्ता गुरव (बी. ए. भाग २)**





# भारताचे संविधान

प्रास्ताविका

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम
समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे स्वातंत्र्य;
दर्जाची व संधीची समानता;
निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तिची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करुन;
आमच्या संविधानसभेत
आज दिनांक २६ नोव्हेंबर १९४९ रोजी
याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमीत
करुन स्वत:प्रत अर्पण करत आहोत.

-भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर

# भारतीय संविधानाची उद्देशिका

**आम्ही** भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम

**समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकतंत्रात्मक गणराज्य** घडविण्यास, तसेच

त्याच्या समस्त नागरिकांना:

सामाजिक, आर्थिक आणि राजनैतिक **न्याय**,

विचार, अभिव्यक्ति, विश्वास , श्रद्धा

व उपासना यांचे **स्वातंत्र्य ;**

दर्जाची व संधीची **समानता; निश्चितपणे**

प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तिची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता व एकात्मता यांचे आश्वासन देणारी **बंधुता परिवर्धित करनेचा संकल्पपूर्वक निर्धार करून;**


**आपल्या या संविधान सभेत** आज दिनांक

नोव्हेंबर २६, १९४९ला **एतद्द्वारे या संविधानला अंगीकृत,**

**अधिनियमीत आणि आत्मार्पित करीत आहोत**

**प्रियांका कांबळे ( बी. ए. भाग १)**


INDIA


प्रजासत्ताक दिन
मुक्त आमचे आकाश सारे,
झुलती हिरवी राने वने,
स्वैर उडती पक्षी नभी,
आनंद आज उरी नांदे
प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा
© www.chitrakavita.com



